**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.**

**दिनांक – 16/03/2024** **वार – शनिवार**

---

**लोक सभा**

देशातील आगामी लोकसभा निवडणुका 19 एप्रिलपासून सात टप्प्यांमध्ये होणार आहेत. मतमोजणी 4 जून रोजी हाती घेण्यात येईल असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत जाहीर केलं. यासोबतच संपूर्ण देशभरात आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. देशामध्ये 97 कोटी नोंदणीकृत मतदार असून 1 कोटी 82 लाख मतदार प्रथमच मतदान करणार आहेत. वर्तमान लोकसभेचा कार्यकाळ यावर्षी 16 जून रोजी संपत आहे. सिक्कीम, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकांची घोषणाही यावेळी करण्यात आली.

लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा 19 एप्रिल रोजी 102 जागांसाठी होईल. दुसरा टप्पा 26 एप्रिल रोजी 89 जागांसाठी, तिसरा टप्पा 7 मे रोजी 94 जागांसाठी, चौथा टप्पा 13 मे रोजी 96 जागांसाठी, पाचवा टप्पा 20 मे रोजी 49 जागांसाठी, सहावा टप्पा 25 मे रोजी 57 जागांसाठी तर अंतिम सातवा टप्पा 1 जून रोजी 57 लोकसभा जागांसाठी होणार आहे.

**पदभार**

पुणे महापालिका आयुक्त म्हणून डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी आज विक्रम कुमार यांच्याकडून पदभार स्वीकारला. विक्रम कुमार यांची एम एम आर डी ए च्या अतिरिक्त आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. गेली तीन वर्षे आठ महिने विक्रम कुमार यांनी पुणे महापालिका आयुक्त म्हणून काम पाहिलं.

**ससून-जंतुसंसर्ग**

बी. जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रूग्णालयाच्या रिसर्च सोसायटीची सुवर्णमहोत्सवी परिषद पार पडली. या परिषदेमध्ये जंतुसंसर्ग प्रतिबंध , उपचार आणि नवीन संशोधन या विषयावर तज्ज्ञांनी सादरीकरण केलं. या परिषदेसाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातून सुमारे 1400 डॉक्टर्स उपस्थित होते. जंतुसंसर्ग या विषयाशी निगडीत 200 हून अधिक संशोधनं सादर करण्यात आली. महाराष्ट्रातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांमधून अहवाल आणि भित्तीपत्रं मांडण्यात आले.

**गोवर-रूबेला**

गोवर रूबेला आजाराचं डिसेंबर 2024 पर्यंत निर्मूलन करण्यासाठी कॅच अप मोहीम सुरू करण्यात आली आहे. या अतंर्गत लसीकरणापासून वंचित राहिलेल्या सात हजार ३७७ बालकांना एमआर लसीची पहिली, तर पाच हजार 574 बालकांना दुसरी मात्रा देण्यात येणार आहे. आरोग्य विभागाकडून कॅच अप मोहिमेत गेल्या तीन महिन्यांमध्ये लसीकरणाचं 87 टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलें अशी माहिती राज्य लसीकरण अधिकारी डॉक्टर प्रविण वेदपाठक यांनी दिली.

**नागरिकत्व**

नव्या नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर गेल्या 7 वर्षात पुणे जिल्ह्यात एकंदर 287 जणांना भारतीय नागरिकत्व प्रदान करण्यात आलं आहे. त्यात पाकिस्तान आणि बांगलादेशातून भारतात आलेल्या स्थलांतरितांचा समावेश आहे. नव्या कायद्यानुसार पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशातील अल्पसंख्यांक समाजाच्या निर्वासित लोकांना भारताचं नागरिकत्व मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. मात्र या कायद्याची अंमलबजावणी सुरु होण्यापूर्वीच पाकिस्तान तसंच बांगलादेशातून हे निर्वासित पुण्यात आले आहेत. त्यापैकी 324 जणांनी भारतीय नागरिकत्व मिळण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे अर्ज केले होते. सध्या त्यातील 287 जणांना भारतीय नागरिकत्व प्रदान करण्यात आलं असून त्यात पाकिस्तानातील

286 हिंदू निर्वासितांचा समावेश आहे. 19 जणांचे अर्ज नाकारण्यात आले असून 18 जणांच्या अर्जावरील प्रक्रिया अद्याप सुरु असल्याचं प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

**नाले**

पुणे महापालिका प्रशासनानें पावसाळ्यापूर्वी शहरातील नाले आणि पावसाळी गटारं स्वच्छ करण्याच्या निविदा या पुर्वगणनपत्रकापेक्षा 10 ते 53 टक्के कमी दरानं आल्या आहेत. सुमारे 11 कोटी रुपयांच्या 23 निविदांना स्थायी समितीनं मंजुरी दिली आहे.

**प्लास्टीक**

अग्रवाल क्लब पुणे चॅरिटेबल ट्रस्ट आणि सिम्बायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र यांनी संयुक्तपणे लवळे इथल्या रुग्णालयात विनामूल्य प्लास्टिक, कॉस्मेटिक्स आणि हाताची शस्त्रक्रिया शिबिर आयोजित केलं होते. या शिबिरात 36 रुग्णांवर प्लास्टिक सर्जरी करण्यात आली. शिबिराचे हे बारावं वर्ष होतं.

**जोगदेव**

ज्येष्ठ क्रीडा पत्रकार हेमंत जोगदेव यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी राणा प्रताप संघातर्फे आज श्रद्धांजली सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. हेमंत जोगदेव यांच्या निधनामुळे क्रीडा क्षेत्रातील एका ध्यास पर्वाचा अंत झाला असून ऑलम्पिक कोश तयार करण्याचं त्यांचं अपूर्ण राहिलेलं स्वप्न पूर्ण करणं हीच खरी श्रद्धांजली ठरेल अशा शब्दात उपस्थित मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**लीग**

आंतरमहाविद्यालयीन स्पोर्ट्स लीग फुटबॉल स्पर्धेत वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघानं मराठवाडा मित्र मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ एन्वायर्नमेंट डिझाईनवर मात केली. दुसऱ्या लढतीत कोल्हापूरच्या डी. वाय. पी. सी. ई. टी संघानं आकुर्डीच्या पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाचा 2-1 असा पराभव केला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**